जा.क्र पोउआ/विशा/**विद्यार्थी**/८५५१/२०२३
पोलीस उप आयुक्त विशा-१, पुणे शहर
दिनांक :-१६/०८/२०२३

**विषय :- तलाठी भरती प्रक्रीयेच्या अनुषंगाने फौजदारी प्रक्रिया संहिता सन-१९७३ चे कलम १४४ प्रमाणे विविध प्रतिबंधात्मक आदेश.**

## आदेश

ज्याअर्थी पुणे शहर आयुक्तालयाचे हद्दीमध्ये **टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) मार्फत पुणे जिल्ह्यात दि.१७ ऑगस्ट २०२३ ते दि.१४ सप्टेंबर २०२३ (दि.२३,२४,२५ व दि.३० ऑगस्ट २०२३ व दि. ०२,०३,०७,०९,११ व १२ सप्टेंबर) वगळुन या कालावधीत सकाळी ०९.०० वा. ते ११.०० वा. आहे. संपुर्ण परीक्षेचे संचलन टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) यांच्या माध्यमातुन होत असुन सदर परीक्षा** परीक्षा पुणे आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात एकुण ११ केंद्रावर परीक्षा घेण्यात येणार आहेत.

ज्याअर्थी माझ्या असे निदर्शनास आले आहे की, सदरच्या परीक्षा ह्या अत्यंत संवेदनशील असल्याने व परीक्षेचे कामकाज सुयोग्य रीतीने पार पाडण्यासाठी खाली नमुद केलेल्या कृत्यांना वेळीच पायबंद घातला नाही तर काहीतरी अनुचित प्रकार घडून परीक्षेच्या प्रक्रियेत मोठया प्रमाणात धोका निर्माण होवून नुकसान होण्याचा संभव आहे.

त्याअर्थी मी **संदिप कर्णिक**, **पोलीस सह आयुक्त, पुणे शहर**, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारान्वये असा आदेश देतो की,

**१.**पुणे शहरातील तलाठी भरती प्रक्रीयेच्या सर्व परीक्षा केंद्राचे इमारतीचे १०० मीटर परिसरात परीक्षेस बसणारे उमेदवार, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, जिल्हाधिकारी पुणे, तथा परीक्षा नियंत्रक, पुणे यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्ती /वाहना खेरीज इतर इसमांना एकत्र जमण्यास किंवा परीक्षा केंद्रात प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

२.तलाठी भरती प्रक्रीयेच्या सर्व परीक्षा केंद्राचे परिसरात दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात येत आहे. सदरचा आदेश संबंधीत परीक्षा केंद्रावर परीक्षेस बसलेले परीक्षार्थी परीक्षेसाठी नेमलेले अधिकारी/कर्मचारी, पोलीसे अधिकारी व कर्मचारी/सुरक्षा अधिकारी यांना लागु होणार नाहीत.

**३.**सदर परीक्षा केंद्राचे इमारतीचे १०० मीटर परिसरातील सार्वजनिक एस.टी.डी/ आय.एस.डी./टेलीफोन बुथ / फॅक्स, झेरॉक्स, मोबाईल फोन, लॅपटॉप व इंटरनेट प्रसार माध्यमे अथवा तत्सम संपर्क साधने बंद ठेवावीत.

४.परीक्षा केंद्रावर मोबाईल, वायरलेस सेट, ट्रान्झिस्टर, रेडीओ, कॅल्क्युलेटर, लॅपटॉप व इतर संपर्क साधने जवळ बाळगण्यास व परीसराच्या १०० मीटर सभोवतालच्या परीसरात वापरण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

**५.**संबंधीत परीक्षा केंद्राचे इमारतीपासून १०० मीटर परिसरात ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे.

**६.**संबंधीत परीक्षा केंद्राचे इमारतीपासून १०० मीटर परिसरात परीक्षेसंदर्भात कोणताही मजकूर लिहिण्यास, अगर छापील मजकूर चिटकविण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदरचा आदेश **दि. दि.१७ ऑगस्ट २०२३ रोजी स.०६.०० ते दि.१४ सप्टेंबर २०२३ रोजी रात्री २०.००** या वेळात अंमलात राहील. सदरच्या आदेशांचे उल्लंघन करणारी व्यक्ती भादवि कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश मी, माझ्या सहीनिशी आज दिनांक १६/०८/२०२३ रोजी दिला आहे.

**ठिकाण - पुणे शहर, दिनांक :- १६/०८/२०२३**

**( संदिप कर्णिक )**
**पोलीस सह.आयुक्त,**
**पुणे शहर**